## शेतक-यांनो उठा,जागे व्हा !धरणे आंदोलनात सहभागी व्हा !!

### आज महाविकास आघाडीचे धरणे आंदोलन

महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २०

भाजप सरकारने निवडणूक जाहिरनाम्यात शेतक-यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले होते, परंतु आजवरहीतीअमलात आणलेलीनाही. तसेच वर्धाजिल्ह्यात झालेल्याअतिवृष्टीमुळेशेतक-यांचेमोठेनुकसानझालेअसून, शासनाने जाहिर केलेली मदत तुटपुंजी असून ती अजूनही



शेतक-यांच्या हाती पोहोचलेली नाही. त्यामुळे या दिवाळीत शेतक-यांच्या घरात अंधार घालण्याचा घाट सरकारकडून घालण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर शेतक-यांच्या विविध न्याय मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने खासदार अमर काळेयांच्या नेतृत्वात २१ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील महात्मा गांधी पुतळ्यासमोर महाविकास आघाडीचे धरणे आंदोलन होणार आहे.या आंदोलनात शेतक-यांची संपूर्ण कर्जमाफी, ओल्या दुष्काळाच्या पॅकेजमध्ये वाढ,रोही व रानडुकरांपासून होणाऱ्या नुकसानीच्या मदतीमध्ये वाढ करण्यात यावी, सोलर पंपाची सक्ती रद्द करून पर्याय निवडण्याचा अधिकार, तसेच शासकीय कामांच्या कंत्राटदारांची प्रलंबित देयके तत्काळ अदा करण्याच्या मागण्या करण्यात येणार आहेत.

## पालकमंत्री डॉ. भोयर यांनी केली साटोडा व बोरगावच्या पीएचसी केंद्राच्या जागेची पाहणी



### दोन्ही प्रा.आ.केंद्राचे होणार रविवारी भूमिपुजन

मंजूर करण्यात आलेल्या बोरगाव मेघे व साटोडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ईमारतीचे भूमी पूजन दत्ता मेघे सभागृह सावंगी मेघे येथे २६ ऑक्टोंबर रोजी दुपारी ११.३० वाजता निरामय वर्धा अभियान सन्मान सोहळा प्रसंगी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ई भूमीपूजन संपन्न होणार आहे.

महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २०

जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या विशेष प्रयत्नामुळे वर्धा शहरालगत असलेल्या बोरगाव (मेघे), साटोडा, सालोड, पिपरी (मेघे), सिंदी मेघे या गावामध्ये पाच प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात आले आहे. मंजूर करण्यात आलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी बोरगाव मेघे व साटोडा, सालोड व सिंदी मेघे येथील प्रस्तावित जागेची आज पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पाहणी केली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले, जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अधियंता शुभम गुंडतवार, शाखा अभियंता नागेश शंभरकर,साटोडाचे सरपंच गौरव गावंडे, सालोडचे उप सरपंच आशिष कुचेवार, जयंत कावळे, सुधाकरराव साटोणे, विजय ताजणे, दिनेश वरटकर,पृथ्वीराज शिंदे आदी उपस्थित होते.

बोरगाव मेघे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ६ कोटी १० लक्ष रुपये व साटोडा येथील ६ कोटी ९ लक्ष रुपये खर्च करण्यात येणार आहे. नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना उपचारासाठी शहरी भागात जाण्याची आवश्यकता पडणार नसून यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या खर्चाची व वेळेची सुध्दा बचत होऊन चांगल्या आरोग्य सेवेचा लाभ या प्राथमिक आरोग्य केंद्रात नागरिकांना मिळणार आहे. असे यावेळी डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले.पालकमंत्री डॉ. भोयर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकाम जागेची पाहणी करून संबंधित अधिका-यांना सूचना केल्या.

## रेल्वेखाली येऊन सात गाई ठार तर सहा जखमी

**हिंगणघाट** -वसुबारसच्या दिवशी एकीकडे गावकरी गोमातांचे पुजन करुन त्यांचा आशिर्वाद घेत होते, तर दुसरीकडे हिंगणघाटजवळील नागपूर काजीपेठ रेल्वेमार्गावर घडलेल्या भीषण अपघातात सात गोमातांचा दुर्देवी मृत्यू झाला, या घटनेत सहा गायी जखमी झाल्या असून त्यापैकी दोन गंभीर आहेत,


ही घटना शुक्रवार, १७ ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास हिंगणघाटपासून अवघ्या अर्धा किलोमीटर अंतरावर घडली, सुमारे १३ गायी रेल्वे रुळांवर खाद्य शोधत असताना हिंगणघाटवरुन चंद्रपूरकडे जाणाऱ्या भरधाव रेल्वेने त्यांना धडक दिली, धडकेत सात गायींचा जागीच मृत्यू झाला, तर उर्वरित गायी गंभीर व किरकोळ जखमी झाल्या,

अपघातानंतरही रेल्वे प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने जीवरक्षक फाउंडेशनचे संस्थापक राकेश झाडे यांनी आपल्या चमूसह घटनास्थळी धाव घेतली, त्यांनी रात्रीच्या अंधारात जीव धोक्यात घालून रेल्वे रुळ ओलांडत जखमी गायींना सुरक्षित स्थळी हलविले, दोन गंभीर जखमी गायींना होयड्राच्या सहाय्याने उचलून गावातील दानशूर नागरिकांच्या मदतीने अमरावती येथील गोकुलम गौरक्षण केंद्रात उपचारासाठी पाठविण्यात आले, उर्वरित किरकोळ जखमी गायींवर जीवरक्षक संस्थेच्या आश्रयात उपचार सुरु आहेत,

अपघातानंतर प्रशासनाने कोणतीही तत्काळ कारवाई न केल्याने ग्रामस्थांत नाराजी व्यक्त होत आहे, मात्र, जीवरक्षक फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी मानवतेचा उत्कृष्ट दाखला देत या मुक्या जीवांना नवजीवन देण्याचा प्रयत्न केला, या बचाव मोहिमेत राकेश झाडे यांच्यासह दिनेश वर्मा, गोलू मडावी, भाविक कोपरकर, ओम कापसे, साहिल माहुरे, ओम मेसरे आणि अन्य स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला, त्यांच्या या मानवतावादी कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

## उत्तर आशियाचा दुर्मिळ पाहुणा तपकिरी खाटिक पहिल्यांदाच वर्ध्यात

### सेवाग्रामच्या मोकळया झुडुपाळलेल्या प्रदेशात टिपली दुर्मिळ नोंद



महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २०

१८ ऑक्टोबरला सकाळी वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम येथे मोकळ्या झुडुपाळलेल्या प्रदेशात पक्षी प्रजातींच्या रंजक जगात तपकिरी खाटिक या नव्या निरीक्षणाची भर पडली. तपकिरी खाटिक यालाच इंग्रजीमधे ब्राउन श्राईक तर याचे शास्त्रीय नाव लॅनियस क्रिस्टॅटस असे आहे.

हा पक्षी वर्धा जिल्ह्यात पहिल्यांदाच आढळला. पक्षी निराक्षणा करीता गेलेल्या प्रतिक पाल व राहुल वकारे यांनी पक्ष्याचे छायाचित्र आणि त्याचा कॉल रेकॉर्ड करून नोंद घेतली.

### तपकिरी खाटिकाची वर्धेत पहिल्यांदाच नोंद

या दुर्लभ नोंदीचा पक्ष्याच्या फोटोंसह जागतिक पक्ष्यांचा महितीसाठा असणाऱ्या ई-बर्ड च्या संकेतस्थळावर नोंद केली गेली असून, वर्धा जिल्ह्यातील हि पहिली अधिकृत नोंद म्हणून नोंदवली गेली आहे. या नोंदीमुळे स्थलांतर दरम्यान वर्धा जिल्ह्यातील अनुकूल पर्यावरणीय परिस्थितीची प्रचीती येते. पक्षिमित्रांमध्ये सर्वत्र प्रतिक पाल व राहुल वकारे यांचे कौतुक होत आहे.

उत्तर आशियाचा दुर्मिळ पाहुणा तसेच मध्यम आकाराचा खाटिक पक्षी, तपकिरी खटिक हा हिवाळी स्थलांतर करणारा पक्षी असून, त्याचा प्रवास सायबेरिया, मंगोलिया, चीन आणि जपान यांहून भारताकडे होतो. साधारण १७ ते २० सेंटीमीटर लांब असलेला या सुंदर पक्ष्याची तपकिरी पाठ व डोके, धवल रंगाची खालची बाजू आणि काळ्या डोळाच्या पट्टीमुळे हा सहज ओळखता येतो. हा मध्यम पण धाडसी शिकारी पक्षी 'खाटिक' सदृष्य वर्तनासाठी प्रसिद्ध आहे. तो आपल्या शिकार केलेल्या अळ्या, लहान बेडके किंवा सरडे यांना झाड्याच्या काटे किंवा तारांवर बोचून ठेवतो आणि नंतर खातो. ही अनोखी पद्धत त्याला इतर पक्ष्यांपेक्षा वेगळे ठरवते आणि त्याच्या हुशारीचा सुद्धा परिचय देते.

## केंद्रिय प्राथमिक शाळेत वाचन प्रेरणा दिन

**नंदोरी :** केंद्रिय प्राथमिक शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा केला, मान्यवरांनी ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कार्याचीमाहितीदिली, यावेळी शाळा समितीचे अध्यक्ष विजय गावंडे, केंद्रप्रमुख राठोड, मिलकर, मुख्याध्यापिका निर्मला निखाडे, शाळा समिती सदस्य मनोहर कोहरके, महादेव नवले, पूनम रोहनकर, माधुरी रोहनकर, शिक्षक किशोर मानकर, शिक्षिका पौर्णिमा धात्रक, उपस्थित होत्या, कार्यक्रमाचे प्रास्ताविक निर्मला निखाडे, यांनी केंले, आभार पौर्णिमा धात्रक यांनी मानले.

## कत्तलीकरिता नेत असलेल्या गोवंश जातीच्या १४जनावरांची सुटका

### कत्तलीकरिता नेत असलेल्या गोवंश जातीच्या १४ जनावरांची सुटका



महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २०

जनावरांना ट्रकमध्ये निर्दयीपणे कोंबून कत्तलीकरिता नेत असताना स्थानिक गुन्हे शाखा पथकाने ट्रक पकडून गोवंश जातीच्या १४ जनावरांची सुटका करण्यात आली.आरोपींच्या ताब्यातुन २१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

१९ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या आदेशाने उप-विभाग हिंगणघाट परीसरात अवैध व्यवसायावर कारवाई दरम्यान पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना मुखबीर कडुन नॅशनल हायवे कमांक ४४ ने जाम कडून हिंगणघाट रोडने ट्रकमध्ये अवैधरित्या जनावरांना कोंबुन गोवंशची तस्करी होत असल्याची माहिती मिळाली. गुन्हे शाखा पथकाने माहितीच्या आधारावर हिंगणघाट परीसरातील सरकारी दवाखाना चौक परीसरात नाकेबंदी करीत असतांना त्यांना एक संशयीत ट्रक येतांना दिसला त्यास थांबवून पाहणी केली असता ट्रकमध्ये कत्तली करीता निर्दयतेने कोंबुन गोवंश जातीची एकूण १४ जनावरे आढळून आली. ट्रक चालक मोहतशीम आलम मुक्तार अन्सारी, वय (४२)रा. कामठी, जिल्हा नागपुर, इवान खॉन मुस्ताक खॉन, वय (३८) रा. कामठी, फिरोज कुरेशी, रा. कामठी, जिल्हा नागपुर यांचे सांगणेप्रमाणे सदर गोवंश जातीचे जनावरांची वाहतुक करीत असल्याचे सांगीतल्याने त्यांचे ताब्यातुन गोवंश जातीचे एकुण १४ लहान मोठी जनावरे, एमएच ४० सिटी ०४३४ किंमत १८लाख दोन मोबाईल असा २१लाख रु चा मुद्देमाल जप्त करुन तिन्ही आरोपींविरुध्द पोलीस स्टशेन हिंगणघाट येथे गुन्हा नोंद करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधिक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधिक्षक सदाशिव वाघमारे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पोलिस उपनिरिक्षक बालाजी लालपालवाले, हमीद शेख, अमर लाखे, चंद्रकांत बुरंगे, अमरदिप पाटील, सचिन इंगोले, भुषण निघोट, धर्मेंद्र अकाली, प्रमोद पिसे, अमोल नगराळे, मंगेश चावरे, सागर भोसले, दिपक साठे, मिथुन जिचकार, राहुल अधवाल, रितेश गेटमे आदींनी केली.


महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी

Website- www.mahapwd.com

**निविदा सुचना दुरूस्ती**


या कार्यालया तर्फे प्रकाशित करण्यांत आलेली निविदा सुचना क्र. ०४/२०२५–२०२६ मध्ये खालील बदल करण्यांत येत आहे.

| कामाचा अनुक्रमांक | करण्यांत येत असलेला बदल |
|---|---|
| कामाचा अनु क्र. ०६,१०,११,१३,१४,१४,१५, ३१,३२,३३,३४, ३८,३९,४०, ४१,४२,४३,४४, | सदर कामे हि ई–निविदा ऐवजी ऑफलाईन (Offline) निविदा समजण्यात यावी. सदर अ.क्र. ची निवदा हि (www.pwd.maharashtra.gov.in) संकेतस्थळावर दि. २७/१०/२०२५ पासुन पाहण्यास भेटती |

वरिल प्रमाणे अंशतः बदल करण्यांत आला असून इतर तपशिलात कोणताही बदल नाही.

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग
आर्वी





## विद्यार्थ्याची विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

**महासागर प्रतिनिधी**
**अल्लीपुर, दि. २०**
येथील इंदिरा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत भाग घेतला, ही स्पर्धा महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद वर्धा यांच्या वतीने पोलिस मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती,

या स्पर्धेत मिळविलेल्या यशामुळे त्यांची विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली, स्पर्धेत १९ वर्षाखालील वयोगटात पीयूष देवेंद्र सुरकार याने गोळा फेकमध्ये प्रथम, थाळी फेकमध्ये द्वितीय तर हॅमर थ्रोमध्ये तृतीय क्रमांक मिळविला, १९ वर्ष वयोगटात सुधीर पदमाकर ढगे याने ५००० मीटर वॉकिंग स्पर्धेत प्रथम स्थान प्राप्त केले, या दोन्ही विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत, जिद्द यामुळे यश मिळविले, विद्यार्थ्यांनी यशाचे श्रेय आई-वडील, प्राचार्या अर्चना विनोद मुडे, पर्यवेक्षक नरेश येडे, क्रीडा शिक्षक अनिल चांभारे, प्रा. हेमंत चरडे, कांचन लोणारे, स्मिता भोगे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिले आहे.

## अनुदान खात्यात जमा न झाल्यामुळे शेतकरी चिंतेत



**महासागर प्रतिनिधी**
**तळेगाव (श्या. पं), दि. २०**
यावर्षी अति वृअतिवृष्टीमुळे शेतपिकांचे मोठे नुकसान झाले असुन शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. त्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतक-यांना शासकीय अनुदान घोषित केले. परंतु अद्यापपावेतो शासकीय अनुदान अद्याप पर्यंत शेतकऱ्याच्या खात्यामध्ये जमा न झाल्यामुळे शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे सावट निर्माण झाले आहेत. परिणामी शासनाच्या कार्यक्षमतेवर पुनश्च प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

, यावर्षी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे सोयाबीन, कापूस, तुर, संत्रा, आधी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच सोयाबीनचा उतारा एकरी २ ते ३ सरासरी लागत आहे. शेतकऱ्यांनी लावलेला खर्च सुद्धा यावर्षी निघाला नाही. यामुळे शेतकरी वर्ग हवालदील झाला आहे. तसेच यासाठी शासनाने ई पीक पाहणी अहवाल तसेच तालुकास्तरीय कृषी सहायकाने पीक पाहणी सर्वेक्षण करून शासन दरबारी अहवाल सादर केला आहे. या सर्वेक्षणानुसार आर्थिक सहाय्य म्हणून प्रति हेक्टरी ८हजार ५०० रु. अनुदानाची घोषणा जाहीर करण्यात आली होती. परंतु दिवाळीच्या शुभ पर्वावर शासकीय अनुदान मिळणार या आशेने शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु अद्याप पर्यंत शासकीय अनुदान खात्यामध्ये जमा न झाल्यामुळे दिवाळी हा सण कसा साजरा करावा? असा यक्ष प्रश्न शेतकरी वर्गामध्ये निर्माण झाला आहे.

याबाबत शासनाने गांभीर्य लक्षात घेऊन, प्रशासनाने तात्काळ अंमलबजावणी करून शासकीय अनुदान शेतकरी वर्ग खात्यामध्ये जमा करावे अशी मागणी शेतकरी वर्गाकडून जोर धरीत आहे.

## दिवाळी व जेष्ठ नागरिक दिनानिमित्त जेष्ठांचा सत्कार

### जेष्ठ नागरिक शॉल श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित



**महासागर प्रतिनिधी**
**देवळी, दि. २०**
ज्येष्ठ नागरिक केवळ कुटुंबाचाच भाग नसतात, तर ते समाजाचे मार्गदर्शक असतात. त्यांचे मार्गदर्शन आपल्याला योग्य मार्गावर चालण्यास मदत करते. त्यांच्या अनुभवी विचारांमुळे अनेक समस्यांवर सोपे उपाय मिळतात. ज्या ज्येष्ठांनी समाजासाठी विशेष योगदान दिले आहे, अशांचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य आहे, जेष्ठ नागरिकांचा सत्कार करणे हे माझे भाग्य आहे. देवळीतील जेष्ठ नागरिकांचे उपकार मी कधीच विसरणार नाही. जेष्ठ नागरिकाकरिता ज्या शासनाच्या विविध योजना आहे त्या मी त्यांना मिळवून देण्याचा पुरेपूर प्रयत्न करील असे माजी खासदार रामदास तडस म्हणाले.

देवळी येथे दिवाळी व जागतिक जेष्ठ नागरिक दिनानिमीत्य जेष्ठ नागरिकांचा सत्कार सोहळा कार्यक्रम माजी खासदार रामदास तडस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी शोभा तडस, डॉ. नरेंद्र मदणकर, नंदु वैद्य, शरद आदमने, रवि कारोटकर, उमेश कामडी, शुभांगी कुर्जेकर, विदया झिलपे, दिलीप कारोटकर, विजय गोमासे, मारोतराव मेघरे उपस्थित होते.

शहरातील ३०० पेक्षा जास्त जेष्ठ नागरिकांना शॉल श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन रवि कारोटकर यांनी केले प्रास्ताविक शुभांगी कुर्जेकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार उमेश कामडी यांनी मानले, यशस्वितेकरिता संजय मुजबैले, अमोल काकडे, दिलीप खाडे, आसिफ शेख, योगेश आदमने, स्वप्नील बुट्टे, विनोद भगत, अरुण कामडी, विक्रम वैद्य, निखिल कावळे, विनोद तेलरांधे, रमेशराव सातपुते, वसंत धोटे, दिपक कामडी, अंकित टेकाडे, विश्वजिता पोटदुखे, ज्योती खाडे, माया वडेकर, वैशाली समर्थ, आशा वाघमारे, वर्षा बावनकुळे, मनीषा लोखंडे, कविता कोटनाके, मंगला मोकडे, रेखा चंदनखेडे, प्रणाली डंबारे, पूजा डंबारे, भाग्यश्री महिस्कर, वर्षा चिंचघाटे, वनिता वावरे, प्रिया फुलमाळी आदींनी सहकार्य केले.

## बंद घरातून ६० हजारांची चोरी

**वर्धा,** -बंद घरातून नगदी ६० हजार रुपयांची चोरी केली, ही घटना नवीन दाभा परिसरात घडली, याप्रकरणी अंकुश प्रकाश नासरे (३०, नवीन दाभा कारंजा), यांनी कारंजा पोलिसात तक्रार दिली, त्यावरुन पोलिसांनी शेषराव आनंदराव ढोरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## सट्टापट्टी जुगारावर छापा

**वर्धा,** -सट्टापट्टी जुगारावर छापा मारून पोलिसांनी ७१ हजार ६६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला, महेश शिवाजी पाटील (रा. खरांगणा) हा सट्टापट्टीचा जुगार चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती, पोलिसांनी त्यांच्यावर छापा मारला असता सट्टापपट्टीचे आकडे लिहिलेला कागद व रोख रक्कम असा एकुण मुद्देमाल जप्त करत गुन्हा दाखल केला.

## यशवंत महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**
**सेलू, दि. २०**
येथील यशवंत महाविद्यालयात ग्रंथालय विभाग व सांस्कृतिक विभागातर्फे वाचन प्रेरणादिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ संदीप काळे यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ अनंत रिंढे उपस्थित होते, प्रमुख वक्ते म्हणून प्रा भूषण तूरणकर तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री आशिष राजू गिरडे आणि ग्रंथालय प्रमुख डॉ रश्मी बकाणे हे उपस्थित होते.

आजच्या पिढीला वाचनाचा छंद लागणे अतिशय आवश्यक आहे. वाचनामुळे विचार शक्ती वाढते, शब्द संग्रह वाढतो, आजूबाजूच्य जगाची माहिती मिळते. वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी ग्रंथालयत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रा भूषण तूरणकर यांनी आपल्या भाषणात वाचन हे संपदनाचे सर्वोत्तम साधन आहे. वाचनामुळे चांगल्या गोष्टीची प्रेरणा मिळते असे मत मांडले. यावेळी सैनिक आशिष गिरडे आणिदुर्गा डोंगरे यांना ग्रंथभेट देण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी आणि प्राध्यापाकांसाठी सामुहिक वाचन हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ रश्मी बकाने यांनी केले संचालन दुर्गा डोंगरे हिने तर आभार समीक्षा भस्मे हिने मानले.कार्यक्रमाला डॉ अर्चना डहाणे, प्रा अर्जुन खोब्रागडे, प्रा सोनाली पावडे, प्रा सीमा देशमुख ,प्रा बारंगे, प्रा विद्या हिंगे, प्रा शिंदे,प्रा जयश्री देशमुख, प्रा किशोरी कोहोड, प्रा सोनाली पावडे, प्रा प्रणिता चाफले, प्रा सीमा देशमुख, प्रा खोडे , प्रा खोरगडे, शिक्षेकेत्तर कर्मचारी , विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मनीषा खेडकर, प्रफुल बुटे, सुरेश पुसाम आदींनी सहकार्य केले.

### प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्यासाठी रॅली

**आर्वी :** येथील निर्मल इंग्लिश स्कूल शाळेतर्फे प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्यासाठी रॅलीचे आयोजन केले होते, यावेळी प्राचार्य सोनल भेंडे यांनी पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले, रॅलीत विद्यार्थ्यांनी नाटकांच्या माध्यमातून प्रदूषणाचे दुष्परिणाम आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्व प्रभावीपणे मांडले, त्यांच्या अभियानातील प्रामाणिकपणा आणि सामाजिक कार्यकर्ते संदेशाने नागरिकांची मने जिंकली.

## विद्युत रोहित्र दुरुस्त करण्यास लाईनमनची चालढकल

### शेतकरी त्रस्त

**महासागर प्रतिनिधी**
**दहेगाव (गो.), दि. २०**
गावालगत असलेल्या तुळजापूर शेतशिवरातील विद्युत रोहित्र गत काही दिवसांपासुन बंद असुन याबाबत लाईनमनला वारंवार सुचना करुनही रोहित्र दुरुस्तीकडे लाईनमन दुर्लक्ष करीत आहे. परिणामी परिसरातील शेतकरी त्रस्त झाले आहे.

लाईनमनवर तत्काळ कारवााई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांनी महावितरणाचे अभियंत्याला निवेदनातून केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले की, शेतातील विद्युत रोहित्र दुरुस्त करण्यात यावे, तसेच वायरमनची बदली करण्याची मागणी करण्यात आली. विद्युत रोहित्र बंद असल्याने ओलित करणे बंद असल्याने पिके वाळत असल्याने शेतक-याच्या चिंता बळावल्या आहे. वीजपुरवठा बंद असल्याने शेतकरी वायरमनला वारंवार भ्रमणध्वनीवर फोन करतात परंतु फोन उचलत नाही आणि उचल्यास शेतक-यांशी उध्दटपणे संवाद साधतो. अशावेळी शेतक-यांना जोखीम पत्करुन खासगी लाईनमनकडून पुरवठा सुरु करावा लागतो, असे अनेक दिवसांपासुन सुरु आहे.

अशा उध्दट व कामचुकार कर्मचा-यावर कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थ करीत आहे.

## यशवंत महाविद्यालयात वादविवाद स्पर्धा

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. २०**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि यशवंत महाविद्यालयातर्फे वादविवाद स्पर्धा घेण्यात आली, ७५ वर्षात भारतीयांमध्ये घटनात्मक लोकशाही रुजली आहे का, हा स्पर्धेचा विषय होता,

उदघाटन समीर देशमुख यांनी केले, मंचावर प्राचार्य डॉ. गिरीश ठाकरे, डॉ. रवींद्र बेले, प्रा. प्रियंका गावंडे उपस्थित होते, समीर देशमुख यांनी स्पर्धामधून विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास होत असल्याचे सांगितले, डॉ. गिरीश ठाकरे यांनी वादविवाद असा स्पर्धा महत्वाच्या असून यानिमित्ताने संविधान समजून घेण्याचे आवाहन केले, डॉ. रविंद्र बेले यांनी स्पर्धेच्या आयोजनाची पार्श्वभूमी प्रतिपादन केली,

स्पर्धेमध्ये २० पेक्षा जास्त स्पर्धक सहभागी झाले, या स्पर्धेतील प्रथम दोन विद्यार्थ्यांनी अंतिम फेरीसाठी राज्यशास्त्र विभागामध्ये नागपूरला पाठविणार आहे,

स्पर्धेत प्रथम पारितोषिक कोमल वऱ्हाडे, वैष्णवी पटवा यांनी तर द्वितीय प्रसाद जांभुळकर व श्रावणी ईटनकर यांनी पटकाविले, परीक्षण डॉ. संजय धोटे, प्रा. राठोड, डॉ. अभिजित वाघाडे यांनी केले, प्रा. अमित जाधव, प्रा. सचिन सोनटक्के, रियाज शेख आदिंनी सहकार्य केले.


आजचा वाढदिवस
दै. महासागर
परिवारातर्फे शुभेच्छा


मयूर धोटे


मंगेश कालवे


अक्षय गुघाणे


सोपान साठवणे


स्वप्नील ढोमणे


डॉ. चंद्रशेखर खडसे


अंकुर भोयर


नितीन भोयर


दिनेश पाटील


## दिवाळी सण साजरा करतांना खबरदारी घेण्याच्या सूचना

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. २०**
दिवाळी सण साजरा करतांना नागरिकांनी आग सुरक्षा, पर्यावरण सुरक्षा, आरोग्य आणि आपत्कालीन तयार, इमारत व विद्युत सुरक्षा बाबत खबरदारी घेण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश खताळे यांनी केले आहे.

**आग सुरक्षा -** फक्त परवानाधाक फटाके विक्रेत्यांकडून फटाके खरेदी करावे, फटाके मोकळ्या जागेत आणि ज्वलनशील वस्तूपासून दूर फोडावे, जवळ पाण्याची बादली, वाळू आणि अग्नशामक यंत्र ठेवा, मुलांना फटाके फोडतांना प्रौढांचे मार्गदर्शन आवश्यक आहे. कापसाचे कपडे वापरा, कारण ते आग पसवरण्याचा धोका कमी करतात. फटाके फोडायला अगरबत्ती अथवा मोमबत्ती वापरा.



**पर्यावरण सुरक्षा -** इको फ्रेंडली दिवाळी साजरी करा, सामुहिक कार्यक्रम आयोजित करा, ज्यामुळे वैयक्तिक फटाक्यांचा वापर कमी होतो. फटाक्यांचा कचरा योग्य प्रकारे विल्हेवाट लावा.आरोग्य आणि आपत्कालीन तयारी - प्राथमिक उपचार पेटी जवळ ठेवा, जवळचे रुग्णालय आणि आपत्कालीन क्रमांक माहिती ठेवा. मोठ्या कार्यक्रमांची माहिती स्थानिक प्रशासनाला द्या, फटाक्यांमुळे निर्माण होणारे प्रखर प्रकाश आणि स्फोटातून उडणारे घातक रायायनिक कण यामुळे डोळ्याला गंभीर दुखापत होऊ शकते. यासाठी सुरक्षित अंतरावरुन फटाके हाताळा आणि शक्य असल्यास संरक्षित चष्मा घाला. किरकोळ भाजलेले अथवा लासलेला भाग थंड पाण्याने लगेच धुआ, फटाक्यातून निर्माण होणारा धूर नाका तोंडावाटे शरीरात जाऊन निर्माण होणाऱ्या दमा तसेच श्वसनाच्या इतर समस्या टाळण्यासाठी सुरक्षित मास्कचा वापर करा.

**इमारत व विद्युत सुरक्षा -** सर्व विद्युत सजावट तपासा, शार्ट सर्किट किंवा ओव्हरलोड होऊ नये, प्रमाणित विद्युत उपकरणे वापरा, तात्पुरती वायरिंग टाळा, निर्गमन मार्ग सजावटीमुळे अडवू नका. घरात पुजा तसेच सजावटीसाठी पेटवलेले दिवे अथवा मेणबत्या ज्वलनशील पदार्थांजवळ ठेऊ नका, फटाक्यांपासून अचानक निर्माण होणाऱ्या मोठ्या आवाजामुळे कानाला दुखापत अथवा श्रवणशक्ती कमी होऊ नये याकरीता कानात कापूस घाला. कान झाका, आणि शक्य असल्यास विना आवाजाचे फटाके वापरा. दिवाळीच्या उत्सवादरम्यान आवश्यकता नसल्यास घरातील गॅस सिलेंडरचे रेग्युलेटर बंद करा.

**आग आणि दुखापत टाळा -** फटाके कोरड्या झाडाझूडपाजवळ, गॅस सिलेंडर किंवा वाहनाजवळ फोडू नये, मुलांना फटाके एकटे फोडू देऊ नये, न फुटलेले फटाके पुन्हा पेटवू नका त्यांना पाण्यात टाका, फटाके फोडायला माचीस किंवा लाइटर वापरु नये, फटाका फोडतांना इतर फटाके जवळपास ठेऊ नका, मोठी झाडे किंवा विजेचे तार असलेल्या जागी रॉकेट किंवा हवेत फुटणारे फटाके फोडू नका.

**पर्यावरणीय धोके -** बंद किंवा गर्दीच्या जागेत कचरा किंवा फटाके जाळू नका, अत्यंत आवाज करणारे फटाके वापरु नका, ध्वनी प्रदुषण नियमांचे पालन करा, फटाक्यांच्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावा.

**आरोग्य आणि सुरक्षा -** जळजळ, श्वासोच्छवासाचा त्रास किंवा डोळ्यांची दुखापतीकडे दुर्लक्ष करु नका, आपत्कालीन मार्ग वाहन किंवा सजावटीमुळे अडवू नका, जास्त दिवे एका सॉकिटमध्ये लावून विद्युत ओव्हरलोड करु नका, भाजलेल्या जागी टूथपेष्ट किंवा बर्फ लावू नये, प्राण्यांच्या सुरक्षेच्यादृष्टीने त्यांचा जवळपास फटाके फोडू नका, असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने कळविले आहे.

### केंद्रिय प्राथमिक शाळेत वाचन प्रेरणा दिन

**महासागर प्रतिनिधी**
**नंदोरी, दि. २०**
केंद्रिय प्राथमिक शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा केला, मान्यवरांनी ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कार्याची माहिती दिली, यावेळी शाळा समितीचे अध्यक्ष विजय गावंडे, केंद्रप्रमुख राठोड, मिलकर, मुख्याध्यापिका निर्मला निखाडे, शाळा समिती सदस्य मनोहर कोहरके, महादेव नवले, पूनम रोहनकर, माधुरी रोहनकर, शिक्षक किशोर मानकर, शिक्षिका पौर्णिमा धात्रक, उपस्थित होत्या, कार्यक्रमाचे प्रास्ताविक निर्मला निखाडे, यांनी केंले, आभार पौर्णिमा धात्रक यांनी मानले.


RNI NO. - 66032/1997
Mahasagar Wardha
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Parmar Complex Havaldarpura Wardha - 442001. Head Office Mob. No. 7447735851, 9922970023. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local editor** Narendra Deshmukh Mob. No: 9011058372 (Responsible for editorial as per PRB act).

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ६६०३२/१९९७
महासागर वर्धा
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, परमार कॉम्प्लेक्स, हवालदारपुरा, वर्धा, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *नरेंद्र देशमुख, फोन : ९०११०५८३७२* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )**

